**श्री. अशोक नानासाहेब कडूस, बडतर्फ शिक्षणाधिकारी यांना शासन सेवेत रुजू करुन घेणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन आदेश क्रमांक: इएसटी-३८०१/प्र. क्र.०५/१४/प्रशा-२,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ०८ डिसेंबर, २०१७

**<u>वाचा :</u>** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन आदेश क्रमांक: इएसटी-३८०१/प्र. क्र. ०५/१४/प्रशा-२, दिनांक ०२.०८.२०१७.

**<u>प्रस्तावना :-</u>**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक २१.१०.२०१० रोजी शिक्षणाधिकारी व तत्सम पदावर सरळसेवने ७४ पदांवर नियुक्ती देण्याकरीता जाहिरात प्रसिध्द केली होती. त्यानुसार आयोगाने परीक्षा घेऊन दिनांक १६.०२.२०१३ च्या पत्राद्वारे पात्र उमेदवारांची शिफारस शासनाकडे पाठविली होती. त्यामध्ये श्री. अशोक नानासाहेब कडूस यांची शिक्षणाधिकारी पदावर त्यांनी सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता, व सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या तपासणीच्या अधिन राहून दिनांक ०८.०८.२०१३ च्या शासन निर्णयाद्वारे नियुक्ती देण्यात आली होती.

१. श्री. दत्तात्रय कारभारी गुंजाळ यांनी श्री. कडूस, शिक्षणाधिकारी यांना तीन अपत्य असूनही शासकीय सेवेत प्रवेश करतेवेळी दोन अपत्य असल्याचे चुकीचे प्रतिज्ञापत्र सादर केले असल्याची तक्रार शासनास केली होती. श्री. अशोक कडूस यांच्या विरूद्धच्या तक्रारीच्या संदर्भात चौकशी करण्याचे निदेश विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत देण्यात आले होते. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी श्रीमती मिनाक्षी राऊत, सहाय्यक संचालक, पुणे विभाग, पुणे व श्रीमती संध्या गायकवाड, उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जि. प. पुणे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. सदर चौकशी अधिकाऱ्यांनी दिलेल्या चौकशी अहवालाच्या आधारे श्री. कडूस यांना दिनांक ७.५.२०१० रोजी तीन अपत्ये असल्याचे सिध्द झाल्यामुळे तसेच श्री. अशोक नानासाहेब कडूस यांनी दिनांक १७.११.२०१० रोजी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्र नमुना-अ मध्ये दोन अपत्ये असल्याबाबत खोटी माहिती सादर केल्यामुळे व श्री. अशोक कडूस यांनी सादर केलेला खुलासा विचारात घेवून वाचा येथे नमूद दिनांक ०२.०८.२०१७ च्या आदेशान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने व नियुक्ती प्राधिकारी यांच्या मान्यतेने श्री. अशोक नानासाहेब कडूस, शिक्षणाधिकारी यांना शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

सदर बडतर्फीच्या आदेशाविरुध्द श्री. अशोक नानासाहेब कडूस यांना शासनाकडे दिनांक १०.०८.२०१७ च्या विनंती अर्जान्वये निवेदन सादर केले आहे. श्री कडूस यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने शासन पुढील प्रमाणे आदेश देत आहे :-

**शासन आदेश :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ मधील कलम ६ मध्ये नमूद केले आहे की, “या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, शासनास, न्याय्य आणि संयुक्तिक वाटेल अशा परिस्थितीत आणि अशा रितीने शिथिलतेची कारणे लेखी नोंदवून या नियमातील कोणत्याही तरतुदी शिथिल करता येतील.” या तरतूदीस अनुसरून श्री. अशोक नानासाहेब कडूस बडतर्फ शिक्षणाधिकारी यांना पुढील कारणास्तव शासन सेवेत रुजू करुन घेण्यात येत आहे.

१. श्री. अशोक नानासाहेब कडूस यांनी दत्तक विधान २०१० मध्ये केले असून, त्याबाबत त्यांनी सदर बाब नोटरी त्वरीत न करता २०१३ मध्ये केली आहे. सदर कायदेशीर बाब त्यांना शासकीय सेवेत प्रवेश करतेवेळी माहित झाली असावी.

२. शासन सेवेत येण्यापूर्वी ते शिक्षक म्हणून कार्यरत होते.

३. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची जाहिरात तिसऱ्या अपत्यानंतर आली आहे तसेच दत्तक विधान तिसऱ्या अपत्याच्या जन्माआधी आहे.

२. सदर आदेश नियुक्ती प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत. सदर प्रकरण पूर्वोदाहरण म्हणून अन्य प्रकरणी ग्राह्य धरता येणार नाही.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२१११५०४१४३६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2017.12.11 15:07:52 +05'30'

(र. प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२.सर्व संचालक,
३.श्री. अशोक नानासाहेब कडूस, ( आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)
४.निवड नस्ती प्रशा-२

**प्रत माहितीसाठी,**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी,
२. मा. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहायक.
३. मा. प्रधान सचिव , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहाय्यक.